प्रेसनोट दि. ०८/०९/२०१८

## इन्टाग्राम अकांउट हॅक करुन तरुणीची बदनामी करणारा आरोपी सायबर क्राईम सेल, पुणे शहर यांचे ताब्यात

पुणे शहरातील रा. मोहन नगर, चिंचवड, पुणे. या भागात राहाणा-या महीला तक्रारदार यांनी सायबर क्राईम सेल, पुणे शहर यांचेकडे त्यांचे इन्स्टाग्राम हॅक करुन व फोटो मॉर्फ करुन अश्लिल फोटो तयार करुन अज्ञात इसमाने इन्स्टाग्राम या सोशल साईटवर अपलोड करुन त्यांची बदनामी केली असलेबाबत तक्रारी अर्ज प्राप्त झाला होता. अधिक चौकशीअंती गैरअर्जदार **रोहित राजेंद्र पाटिल, वय – १९ वर्ष, रा. मुळे पो. थळ, अलिबाग, रायगड,** याने सदरचा प्रकार केल्याचे निष्पन्न झाले त्यास ताब्यात घेवून अधिक चौकशी केली असता आरोपी हा फिर्यादी यांचे **इन्स्टाग्रामचे** अनधिकृतरीत्या ॲक्सेस घेवून त्यावर अश्लिल फोटो मॉर्फ करुन पोस्ट करुन यांची बदनामी करत होता. तसेच फिर्यादी यांचे मित्रांना अश्लिल फोटो पाठवुण त्यांच्याशी चॅटींग करीत होता. सदर बाबत चौकशी करीता फिर्यादी व आरोपी हे एकाच गावातील असून आरोपी हा फिर्यादी यांचे वर एकतर्फी प्रेम करत होता. फिर्यादी हे त्यास प्रतिसाद देत नसल्याने सदरचे कृत्य केले आहे. सदर आरोपीस ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरूध्द गुन्हा दाखल करुन कारवाई करणेकामी त्यास पिंपरी पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी ही पोलीस उप-आयुक्त शिरीष सरदेशपांडे, सहा.पोलीस आयुक्त निलेश मोरे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक जयराम पायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि मंदा नेवसे व कर्मचारी पो.शि भुषण शेलार, मपोशि ज्योती दिवाणे या पथकाने कारवाई केली आहे.